# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (जनसंपर्क विभाग)

**प्रसिद्धी पत्रक                                    ता. १० डिसेंबर २०१९**

# आठवडी बाजारांतील अतिक्रमण काढा!

**स्थायी समिती सभापती प्रदीप पोहाणे यांचे निर्देश : हसनबाग, उदयनगर व अन्य बाजारांचा केला दौरा**

**नागपूर, ता. १० :** नागपूर शहरात रस्त्यांवर भरत असलेल्या आठवडी बाजारांमुळे वाहतुकीत अडथळा निर्माण होतो. अपघातही होतात. नागरिकांच्या यासंदर्भात मोठ्या प्रमाणात तक्रारी आल्यानंतर स्थायी समितीचे सभापती प्रदीप पोहाणे, जलप्रदाय समितीचे सभापती विजय (पिंटू) झलके आणि स्थापत्य समितीचे सभापती अभय गोटेकर यांनी अधिकाऱ्यांसोबत दौरा केला. आठवडी बाजार इतरत्र हलवून बाजारातील अतिक्रमण काढण्याचे निर्देश दिलेत.

त्यांच्यासह नेहरूनगर झोनच्या सहायक आयुक्त स्नेहा करपे, प्रवर्तन विभागाचे सहायक आयुक्त अशोक पाटील, हनुमाननगर झोनचे अधिकारी सर्वश्री हेडाऊ, लामसुंगे, मंगेश राऊत, सुनील काडे, नेहरूनगर झोनचे सिंगनजुडे, देवराव झाडे उपस्थित होते. पदाधिकाऱ्यांनी या दौऱ्यात

हसनबाग बाजार, उदयनगर बाजार, मानेवाडा मार्गावरील सिद्धेश्वर सभागृहाजवळील बाजार आणि म्हाळगीनगर चौकातील बाजाराला भेट दिली. तेथे भाजीविक्रेत्यांसोबतच नागरिकांशीही संवाद साधला. बाजार हा नागरिकांसाठी सोयीचा असला तरी भर रस्त्यावर दुकान मांडणे योग्य नाही. यामुळे वाहतुकीत अडथळा निर्माण होऊन अपघाताची शक्यता बळावते. त्यामुळे बाजार इतरत्र हलविण्याची मागणी नागरिकांनी केली.

समस्येचे गांभीर्य लक्षात घेऊन स्थायी समिती सभापती प्रदीप पोहाणे यांनी भाजीविक्रेत्यांना त्यांनी केलेले अतिक्रमण हटविण्यास सांगितले. भाजीविक्रेत्यांना नोटीस देण्यात यावा. लवकरात लवकर सदर कार्यवाही करण्याचे निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.